# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई **दिनांक ०१.१०.२०२१**

नवी मुंबई मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा पोलीसांकडुन नवी मुंबई, मुंबई, मिरा–भाईंदर परिसरातुन मोटार सायकल चोरी करणाऱ्या विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन ८ चोरीच्या मोटार सायकली हस्तगत

नवी मुंबई परिसरातुन मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांचे प्रमाण वाढत असल्याने चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत विशेष मोहीम राबवुन कारवाई करणेबाबत मा.पोलीस आयुक्त सो., नवी मुंबई व अपर पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी आदेशीत केले आहे. त्यानुसार श्री. प्रविणकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त व श्री. विनोद चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली नवी मुंबई आयुक्तालयामध्ये गुन्हे शाखेकडुन मोटार सायकल चोरीच्या आरोपींचा शोध लावुन गुन्हे उघडकीस आणण्याची विशेष मोहीम सुरू आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले यांनी मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखा, नवी मुंबई मधील अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार केले. मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे सपोनि राजेश गज्जल व पोना/२००१ लक्ष्मण कोपरकर यांना त्यांच्या विश्वसनिय बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमीवरून कोपरखैरणे पोलीस ठाणे, गुन्हा रजि. क्र. २०२/२०२१ भादविस कलम ३७९ या गुन्हयाचे समांतर तपासादरम्याण उलवे, नेरूळ, नायगाव (वसई-विरार) परिसरात सापळा रचुन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या विधीसंघर्षग्रस्त बालकांकडे केलेल्या तपासात विधीसंघर्षग्रस्त बालकांनी त्यांचे इतर साथीदारांसह नवी मुंबई, मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर परिसरातुन मोटार सायकली चोरी केल्याचे कबुल केल्याने केलेल्या तपासात **४,२५,०००/- रू किंच्या एकुण ८ चोरीच्या मोटार** सायकली खालीलप्रमाणे वर्णनाच्या व किंमतीच्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

१) ३५,०००/- रूपये किंमतीची सुझूकी कंपनीची ॲक्सेस १२५ स्कुटर क्र. एम.एच./०१/डी.एल./६२४३
(**कोपरखैरणे पो.स्टे.नवी मुंबई, गुरक्र २०२/२०२१ मधील**)

**२)** ५०,०००/- रू किंची बजाज पल्सर २२० मोटार सायकल क्र. एम.एच.०३/सी.व्ही/६२०१,
**(घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई गु.रजि.नं. ३३/२०२१ भादवि कलम ३७९ मधील)**

३) ३०,०००/- रू किंची सुझुकी एक्सेस मोटार सायकल क्र. एम.एच.०४/के.क्यु./५१०८,
**(टिळक नगर पोलीस ठाणे गु.रजि.नं. ४८७/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ मधील )**

४) ८०,०००/- रू किंची यामहा एफ.झेड. मोटार सायकल क्र. एम.एच.०१/डी.सी./२५५४,
**(किडवाई मार्ग पोलीस ठाणे, मुंबई गु.रजि.नं. ३४३/२०२१ भा.द.वि. कलम ३७९मधील )**

५) ९०,०००/- रू किंची डिओ मोटार सायकल क्र. एम.एच.४८/बी.जी./२६३०,
**(मिरा-भाईंदर आयुक्तालयतील वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं. ६४७/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ मधील)**

६) ४०,०००/- रू किंची सुझुकी एक्सेस काळया रंगाची मोटार सायकल क्र. एम.एच.०१/सी.वाय/९५९४,
**(शीव पोलीस ठाणे, मुंबई गुरक्र ६६/२०२१ भादविस कलम ३७९ मधील)**

७) ४०,०००/- रू किंची सुझुकी एक्सेस ग्रे रंगाची मोटार सायकल क्र. एम.एच.०२/ई.एक्स/७९०२,
**(मिरा-भाईंदर आयुक्तालयतील वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं. ८३०/२०२१ भा.द.वि. कलम ३७९ मधील)**

८) ६०,०००/- रू किंची निळया रंगाची बजाज २२० पल्सर मो.सा. क्र. एम.एच.४८/ए.एल./९६१२, **(तपास चालु आहे)**

विधीसंघर्षग्रस्त बालक व त्यांचे इतर साथीदार यांनी आणखीन मोटार सायकली नवी मुंबई, मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर परिसरातुन मोटार सायकली चोरी केल्याची माहिती मिळत असुन अधिक तपास चालु आहे.

**एका विधीसंघर्षग्रस्त बालकावर पुर्वी दाखल असलेल्या गुन्हयांची माहिति पुढीलप्रमाणे :-**

| अ. क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र. व कलम | मोटार सायकलचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | पनवेल शहर | २८४/२१ भादवि ३७९ | ३५,०००/- सुझुकी कंपनीची ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-46-BT-1658 |
| २ | पनवेल शहर | २५२/२१ भादवि ३७९ | ७०,०००/- पियागो कंपनीची आप्रिला मो.सायकल क्र. MH-46-BR-5040 |
| ३ | पनवेल तालुका | १२६/२१ भादवि ३७९ | ४०,०००/- बजाज पल्सर मो.सायकल २२० क्र. MH-46-AN-3007 |
| ४ | खांदेश्वर | ११०/२१ भादवि ३७९ | ९०,०००/- बजाज पल्सर एनएस २०० मो.सायकल क्र. MH-46-BX-3883 |
| ५ | न्हावाशेवा | ८२/२१ भादवि ३७९ | ४०,०००/- मेटॅलिक सुझुकी ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-46-BS-1367 |
| ६ | खारघर | २२९/२० भादवि ३७९ | २५,०००/- सुझुकी ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-46-BS-5215 |
| ७ | रबाळे | १५२/२१ भादवि ३७९ | ३०,०००/- सुझुकी ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-43-BT-7011 |
| ८ | उरण | १३९/२१ भादवि ३७९ | बेवारस मिळुन आल्याने उरण पो.ठा. येथे जमा आहे. |

सदरची उल्लेखनिय कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले, सपोनि राजेश गज्जल, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, पोलीस अंमलदार - नितीन जगताप, मंगेश वाट कोपरकर,अजय कदम, किरण राउत, विजय खरटमोल, राहुल वाघ यांनी केलेली असुन गुन्हयाचा तपास सपोनि राजेश गज्जल, मध्यवर्ती कक्ष गुन्हेशाखा, नवी मुंबई हे करीत आहेत.

******************